महाराष्ट्र शासन

# महिला व बाल विकास विभाग

## महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

## सरळसेवा भरती जाहिरात क्रमांक ०१/२०२५

जनहित याचिका क्रमांक १५२/२०११ बाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी महिला व बाल विकास विभागाकडील संरक्षण अधिकारी कनिष्ठ गट-क या संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत दि. ६/११/२०२५ रोजी आदेश पारित केलेले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक ६/११/२०२५ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक आचार संहितेच्या काळात, संरक्षण अधिकारी कनिष्ठ संवर्गातील रिक्त असलेली १७ पदे सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे भरण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाने पत्र क्र. मबाआ-२०१२/प्र.क्र.२५/का-७ दिनांक १४/११/२०२५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त आस्थापनेवरील संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस-६ : १९९००-६३२००) या संवर्गातील सरळसेवा कोट्यातील रिक्त असलेली पदे १७ भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर सरळसेवा भरती प्रक्रियेशी संबंधित सविस्तर जाहिरात व ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतची सुविधा https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर दिनांक ८/१२/२०२५ पासून उपलब्ध होणाऱ्या ऑनलाईन लिंकवर उपलब्ध करून दिली जाणार आहे. उमेदवारांनी संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचून केवळ ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज सादर करावेत. प्रस्तुत भरती प्रक्रियेकरिता केवळ उक्त संकेतस्थळावरून ऑनलाईन पद्धतीने भरलेला अर्ज व ऑनलाईन पद्धतीने भरण्यात आलेले परीक्षा शुल्क ग्राह्य धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज/परीक्षा शुल्क ग्राह्य धरण्यात येणार नाही.

भरती प्रक्रियेसंदर्भातील सर्व कार्यक्रम वेळापत्रकातील बदल इत्यादीबाबतच्या सूचना https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. उमेदवारांशी भरती प्रक्रियेबाबत कोणताही स्वतंत्रपणे पत्रव्यवहार करण्यात येणार नसून सदर संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या सूचनांची दखल घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी.

| | |
|---|---|
| ऑनलाईन पद्धतीने अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याचा सुरवात दिनांक | दिनांक ८/१२/२०२५ दुपारी १५.०० वाजेपासून |
| ऑनलाईन पद्धतीने अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २२/१२/२०२५ रात्री २३.५५ वाजे. पर्यंत |

उक्त भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, त्यामध्ये अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण किंवा संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे, भरती प्रक्रियेच्या वेळापत्रकात बदल करणे, सामाजिक, समांतर/ दिव्यांग/ इतर आरक्षणामध्ये संवर्गनिहाय/ पदनिहाय बदल करण्याचे, सरळ भरती प्रक्रियेच्या जाहिरातीमधील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे/ नव्याने अटी व शर्ती समाविष्ट करण्याचे/अटी व शर्ती रद्द करण्याचे सर्व अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी राखून ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

स्थळ : पुणे

दिनांक : १८/११/२०२५

स्वा/-

(नयना-अर्जुन गुंडे) भा.प्र.से.

आयुक्त

महिला बाल विकास

महाराष्ट्र राज्य, पुणे

[Dgipr No. 2025-26/R.5/C-4106]

Mahabharti.in

Scanned with OKEN Scanner